# G. G. DANDEKAR MACHINE WORKS LTD.

DANDEKAR™
Built to Last

Ref No.: GGD/Sec./2020/09/04
Dated: 7th September, 2020

BSE Scrip Code: **505250**

To
Corporate Relationship Department
BSE Limited
1st Floor, P. J. Towers
Dalal Street, Fort,
Mumbai – 400 001

Dear Sir/Madam,

**Subject: Copies of Notices of published in the Newspapers**

Pursuant to Regulation 30 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, please find enclosed herewith copy of Notice published in Free Press Journal, Mumbai and Mahasagar, Nagpur on 7th September, 2020 regarding Annual General Meeting, Remote e-voting and Book Closure for the 81st Annual General Meeting to be held on 28.09.2020 at 11.30 a.m. (IST) through Video Conferencing / Other Audio Visual Means.

You are kindly requested to take the same on record.

Thanking You

Yours Faithfully,
For **G. G. Dandekar Machine Works Limited**

Sayalee Yengul
**Company Secretary**

Encl: As above

# महापालिकेची आरोग्यव्यवस्था दर्जाहिन

**नागपूर :** उपराजधानीत झपाट्याने वाढलेल्या करोनाबाधितांवर उपचार करण्यास मनपाची आरोग्य यंत्रणा सक्षम नाही. महापालिकेची आरोग्य व्यवस्थाही दर्जाहिन आहे. शहराची जबाबदारी महापालिकेकडे असल्याने आवश्यक ती खबरदारी घेण्याची गरज होती. मात्र, अदृश्य शत्रू असलेल्या करोना विषाणूशी दोन हात करण्याइतपत मनपाची आरोग्य यंत्रणा तयार नाही, असे सध्याच्या व्यवस्थेवरून दिसते, असे निरीक्षण नागपूर शहरातील करोना प्रादुर्भावाच्या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आलेल्या तज्ज्ञांच्या चमुतील मुंबई मनपाचे आयुक्त इकबालसिंह चहल यांनी नोंदविले. यावरून करोना रोखण्यासाठीच्या आतापर्यंतच्या व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

मुंबईतील धारावी, कोळीवाडा येथील करोनास्फोटामुळे अवघे मुंबई शहर हादरले होते. मात्र, तेथील परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यात आलेले यश बघता तेथील उपाययोजनांकडे यशस्वी 'धारावी पॅटर्न' म्हणून बघितले जात आहे. ज्या धारावीत रोज अडीचशेवर करोना रुग्ण यायचे. आज तिथे आज दिवसाकाठी चार ते पाच रुग्ण आढळत आहेत. यावरून या भागात केलेल्या कडक उपाययोजना प्रभावी ठरल्या. मुंबईचे मनपा आयुक्त चहल यांनी करोना नियंत्रणासाठी डॉक्टरांची विशेष टीम घेऊन विषाणूच्या प्रसार मुळापासून रोखण्यासाठी नियोजन केले. परिणामी, हे नियोजन यशस्वी ठरत मुंबईसारख्या कोट्यवधी लोकसंख्या असलेल्या राजधानीतील या भागातील करोनाबाबतची परिस्थिती नियंत्रणात आली आहे.

प्रभावी उपाययोजना पडल्या तोकड्या

साथरोग कायदा, १८९७ मध्ये सुधार करीत महापलिका आयुक्तांना मनपा हद्दीत सर्वेसर्वा असा दर्जा



देण्यात आला. त्यामुळे आयुक्तांची भूमिका महत्त्वाची ठरत आहे. मे ते जून या दोन महिन्यात शहरात करोना रुग्ण वाढले नाहीत. मात्र, जुलैपासून रुग्ण वाढण्यास सुरुवात झाली. तत्कालीन मनपा आयुक्त तुकाराम मुंढे यांनी काही प्रभावी उपाययोजना केल्या. मात्र, विषाणूवर मारा करणारे नियोजन वैद्यकीय टीमसह उभे केले नाही. त्यामुळे वरवरच्या प्रभावी योजना ठप्प पडल्या. त्याचा प्रभाव परिणामकारकपणे पुढे आला नाही. वेगवेगळया पातळीवरील नियोजन तसेच पायाभूत सुविधांसह आरोग्य व वैद्यकीय सेवांसाठी तज्ज्ञ चमूंकडून स्वतंत्र नियोजन अपेक्षीत होते. पाच रुग्णालये घाईघाईत तयार झाली. मात्र, तज्ज्ञ मनुष्यबळ उभे करता आले नाही. त्याऐवजी, शहरात कंटेन्मेंट झोनवर लक्ष केंद्रित करण्यात आले. हा प्रारंभीचा प्रभावी उपचार असला तरी कुठल्याही आजारावर वैद्यकीय उपचारानेच नियंत्रण मिळवावे लागणार होते. मात्र, त्या दिशेने ठोस काम झाले नाही. आता मनपात नवे आयुक्त असल्याने सप्टेंबर व ऑक्टोबर या दोन महिन्यांत कुठल्या प्रभावी उपाययोजना व नियोजन आखले जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मुंबईचे मनपा आयुक्त चहल यांच्या टीप्स

रूग्णालय व्यवस्थापनावर लक्ष द्या

-झोननिहाय वॉररूम तयार करा

-चाचण्यांची संख्या वाढवा

-रुग्णालयातील खाटा वाढवा

रूग्णालयांत तज्ज्ञ मनुष्यबळ तातडीने नियुक्त करा

-आरटीपीसीआर चाचणींचा अधिकाधिक वापर क

-ॲम्बुलन्सची संख्या वाढवा

-प्रत्येक रुग्णालयात खाटा, उपचार व इतर माहितीसाठी डॅशबोर्ड लावा

खासगी वा सरकारी रुग्णालयात वॉर रूम वाढवा

-खाटांच्या उपलब्धतेसाठी ऑनलाइन पद्धत तातडीने सुरू करा

-रुग्णालयातील स्वच्छतागृहांचे दर चार दिवसांनी निर्जंतुकीकरण करा

घरी अलगीकरण व्यवस्था नसलेल्यांना तातडीने अशा केंद्रांत हलवा

-पॉझिटिव्ह व घरीच अलगीकरणात असलेल्यांच्या नातेवाईकांचीही तातडीने चाचणी घ्या

-पॉझिटिव्ह रुग्णांच्या नातेवाईकांवर लक्ष ठेवून त्यांना फिरण्यावर मर्यादा घाला

# दोन लाख घ्या! मनपा रुग्णालयात या!!

**नागपूर :** करोनामुळे मनपाची वैद्यकीय व रुग्णालय व्यवस्था कोलमडली आहे. मनुष्यबळाअभावी तज्ज्ञ डॉक्टर्स व स्टाफ नसल्याने मोठी अडचण होत आहे. यापूर्वी एकदा जाहिरात देऊनही डॉक्टर्सनी पाठ फिरविल्यानंतर आता या रकमेत वाढ करण्यात आली आहे. स्पेशालिस्ट डॉक्टर्सना मासिक दोन लाख रुपये मानधन देण्याचीही मनपाची तयारी आहे. शिवाय, इतर स्टाफसाठी पीपीई किट घालून काम केल्यास अतिरिक्त मानधन देण्याची तयारी दर्शविली आहे. मंगळवार, ८ सप्टेंबरच्या स्थायी समिती बैठकीत हा प्रस्ताव मंजुरीसाठी आणल्या जाणार आहे. पुढील तीन महिन्यांसाठी ही तातडीची मनुष्यबळ यंत्रणा उभी करण्यात येणार आहे.



करोनामुळे मनपाची आरोग्ययंत्रणा विस्कळीत असून तज्ज्ञ डॉक्टरांचीही वानवा आहे. त्यात करोनासाठी मनपा रुग्णालय व कोव्हिड सेंटर सज्ज करण्यात येत असल्याने मनुष्यबळाची तातडीची गरज आहे. मेडिकल, मेयो व आरोग्य विभागाकडे मागणी केल्यावरही तज्ज्ञ न मिळाल्याने मनपाने जाहिरात देऊन मनुष्यबळ उपलब्ध करून घेण्याची तयारी दर्शविली आहे. त्यानुसार स्पेशालिस्ट डॉक्टर्सना दोन लाख रुपयांपर्यंत मानधन देण्याची तयारी आहे. त्याखालोखाल मेडिकल ऑफिसर यांनाही चांगले वेतन देण्यात येणार आहे. सद्यस्थितीत मनपाला एकूण २१८ एवढ्या मनुष्यबळाची गरज आहे. तीन महिन्यांसाठी ९७.९८ लाखाची तरतुदही त्यासाठी केली आहे. या सर्व नियुक्त्या कंत्राटी पद्धतीवर राहणार आहे.

या प्रस्तावांतर्गत फिजीशियन व इन्सेटव्ह केअर तज्ज्ञास ७५ हजार फिक्स मानधन व इन्सेंटिव्हच्या रूपात १.२५ लाख असे एकूण २ लाख वेतन देण्यात येणार आहे. याशिवाय मेडिकल ऑफिसर, हॉस्पिटल मॅनेजर, स्टाफ नर्स, एक्स-रे तंत्रज्ञ, इसीजी तंत्रज्ञ, डाटा एन्ट्री ऑपरेटर, वॉर्ड बॉय आदी पदे भरली जाणार आहेत. वेतनावरील खर्च आरोग्य विभागाच्या आस्थापना खर्चातून करण्यात येणार आहे.

## क्राईम डायरी

### दुसऱ्या माळ्यावरून पडल्याने मृत्यू

**नागपूर.** गिट्टीखदान पोलिस ठाण्यांतर्गत दुसऱ्या माळ्यावरून खाली पडल्याने एका वृद्ध व्यक्तीचा गंभीर जखमी झाल्याने उपचारादरम्यान मृत्यू झाला. मृतक साई ८, फ्रेन्ड्स कॉलनी निवासी भारतसिंग आनंदकरणसिंग ठाकूर (५६) आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, भारतसिंग हे फ्रेन्ड्स कॉलनीमध्ये साई ८ इमारतीच्या दुसऱ्या माळ्यावर राहतात. गेल्या १९ ऑगस्टला दुपारी १.४५ वाजताच्या सुमारास ते बालकनीत उभे होते. दरम्यान अचानक त्यांचा तोल गेल्याने ते खाली पडून गंभीर जखमी झाले. कुटुंबीयांनी त्यांना उपचारार्थ खासगी रुग्णालयात भरती केले असता उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी मिळालेल्या सूचनेवरून पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

### ८३ हजारांची घरफोडी

**नागपूर.** हुडकेश्वर पोलिस ठाण्यांतर्गत अज्ञात चोराने लोखंडी ग्रीलचा कोंडा तोडून एका महिलेच्या घरात प्रवेश करीत ८३ हजारांच्या मुद्देमालावर हातसाफ केला. या प्रकरणी पोलिसांनी श्रीरामनगर निवासी कोमल वामन पापेवार (३०) यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २७ ऑगस्टला सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास कोमल घराला कुलूप लावून खापरी येथील ताज मेहंदी दरबार यांच्याकडे गेल्या होत्या. दरम्यान मध्यरात्रीला अज्ञात चोराने मुख्य दाराच्या लोखंडी ग्रीलचा कोंडा तोडून आत प्रवेश करीत बेडरुममधील कपाटातून सोन्याचे दागिने व रोख ५,५०० असा एकूण ८३,००० रुपयांच्या मुद्देमालावर हातसाफ केला. २९ ऑगस्टला सकाळी घरी परतल्यावर कोमल यांना घरात चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेची माहिती पोलिसांना देत तक्रार दाखल केली. प्राथमिक तपासानंतर पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### नोकरीच्या नावावर युवतीला गंडा

**नागपूर.** बँकेत नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून एका महिलेने युवतीची १.५४ लाख रुपयांनी फसवणूक केली. या प्रकरणी अंबाझरी पोलिसांनी साईनगर, वाडी निवासी प्रतीभा गजानन भादे (२८)च्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. आरोपी महिला कारंजा घाडगे, वर्धा निवासी अश्विनी ठवळे आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रतीभा चांगल्या नोकरीच्या शोधात होती. दरम्यान १० सप्टेंबर २०१८ ला तिची ओळख अश्विनी ठवळेशी झाली. अश्विनीने बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये प्रमुख रोखपाल असल्याची बतावणी करून प्रतीभाला लिपिक पदावर नोकरी लावून देण्याचे आमिष दाखविले. प्रतीभा तिच्या जाळ्यात अडकली. सप्टेंबर २०१८ ते नोव्हेंबर २०१८ दरम्यान नोकरीसाठी अश्विनीने प्रतीभाकडून १ लाख ५४ हजार रुपये घेतले, मात्र नोकरी लावून दिली नाही. अनेक दिवस प्रतीक्षा केल्यानंतर प्रतीभाने तिला पैसे परत मागितले. परंतु अश्विनी सतत टाळाटाळ करू लागली. अखेर कंटाळून प्रतीभाने पोलिसात तक्रार दाखल केली. पोलिसांनी अश्विनीविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### तणावातून चालकाचा गळफास

**नागपूर.** अजनी पोलिस ठाण्यांतर्गत एका व्यक्तीने तणावातून गळफास लावत आत्महत्या केली. मृतक कुजीलालपेठ, रामेश्वरी रोड निवासी अमर शिवलाल चौधरी (४०) आहेत. अमर ड्रायव्हींगचे काम करीत होते. त्यांना दारूचेही व्यसन होते. त्यांच्या व्यसनाला कंटाळून पत्नी मुलांसह गेल्या ६ वर्षांपासून माहेरी रहात आहे. पत्नी आणि मुलांनी घर सोडल्यापासून ते एकटे पडले होते. यामुळे त्यांचे व्यसनही वाढले होते. त्यांची बहीण शेजारीच आपल्या कुटुंबासह राहते. नेहमीप्रमाणे शुक्रवारी सायंकाळी अमर दारू पिऊन घरी परतले. याच दरम्यान त्यांनी छताच्या लाकडी बल्लीला दोरी बांधून गळफास लावला. रात्री उशिरापर्यंत अमरची कोणतीही हालचाल दिसत नसल्याने शेजारी राहणारे कैलास बोराडे यांनी त्यांना आवाज दिला, मात्र प्रतिसाद मिळाला नाही. कैलास यांनी खिडकीतून आत डोकावले असता अमर गळफास लावलेल्या अवस्थेत दिसले. त्यांनी तात्काळ घटनेची माहिती कुटुंबीयांसह पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळ गाठून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रवाना केला. अमर यांच्या मृत्यूचे नेमके कारण समजू शकले नाही. मात्र एकटेपणाला कंटाळूनच त्यांनी आत्महत्या केल्याचे बोलले जात आहे. सध्या पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

### पोलिस कर्मचाऱ्याच्या मुलाने घेतले विष

**नागपूर.** कळमना ठाण्यांतर्गत एका पोलिस कर्मचाऱ्याच्या मुलाने मानसिक तणावातून विष प्राशन करीत आत्महत्या केली. मृतक कळमना रेल्वे क्वॉर्टर समोर प्लॉट क्र. ३९ निवासी प्रशांत विनोद वांदे (२८) आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रशांतचे वडील पोलिस नियंत्रण कक्षात एएसआय आहेत. शुक्रवारी दुपारी प्रशांत मोटारसायकलने कुठेतरी गेला होता, मात्र सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास तो पायदळच घरी परतला. कुटुंबीयांनी त्याला मोटारसायकलबाबत विचारले असता त्याने कोणतेही उत्तर दिले नाही आणि आपल्या खोलीत जाऊन दरवाजा बंद केला. काही वेळाने त्याचे वडील विनोद कामावरून घरी परतले. कुटुंबीयांनी त्यांना प्रशांतबाबत माहिती दिली. वडिलांनी प्रशांतला बाहेर बोलावून मोटारसायकलबाबत विचारपूस केली असता त्याने विष प्राशन केल्याचे सांगितले. हे ऐकताच कुटुंबीयांच्या पायाखालची जमीनच सरकली. त्याला तात्काळ उपचारार्थ मेयो रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. प्रशांतच्या आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. त्याच्या मोटारसायकलबाबतही कोणतीही माहिती मिळाली नाही. सध्या पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

# पित्यापाठोपाठ २४ तासांत पुत्रही ठरला करोनाचा बळी; 'त्या' डॉक्टरवर आरोप

**नागपूरः** प्रकृती अस्वस्थ झाल्याने घरच्यांनी मोठ्या विश्वासाने १०८ क्रमांकावर फोन केला. काही वेळातच रुग्णवाहिका महिला डॉक्टरसह दारात उभी झाली, पण रुग्ण करोनाचा आहे असे समजताच डॉक्टरांच्या डोक्यावर आठ्या आल्या. विनंती केल्यानंतर त्यांनी रुग्णाची नाडी पाहिली आणि हे मृत झाल्याचे सांगितले, मात्र घरच्यांच्या मते त्यांनी सोबत आणलेल्या रुग्णवाहिकेनेच रुग्णालयात नेले असते तर प्राण वाचू शकले असते. हा दुर्दैवी अनुभव शनिवारी सकाळी शहरातील अड्याळकर कुटुंबीयांनी घेतला. जेष्ठ लोहियावादी व गांधीवादी, सामाजिक कार्यकर्ते

हरीष अड्याळकर यांचे गुरुवारी सायंकाळी करोना संसर्गाने निधन झाले असतानाच शनिवारी सकाळी त्यांचा मुलगाही याच आजाराने दगावल्याने अड्याळकर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

आठवडाभरापूर्वीच हरीष अड्याळकर यांना बरे वाटत नसल्याने व मुलगा त्यांना सर्वसाधारण उपचारासाठी डॉक्टरांकडे घेऊन जात असल्याने दोघांनाही करोनाची चाचणी केली व ती पॉझिटिव्ह आली. त्यामुळे हरीष अड्याळकर यांना ऑगस्ट रोजी (रविवारी) मेडिकलमध्ये दाखल करण्यात आले. मुलगा घरीच विलगीकरणात होता. दरम्यान, गुरुवारी सायंकाळी हरीष यांचे निधन झाले. त्याचा मोठा धक्का मुलगा नितीन अड्याळकर यांना बसला. शुक्रवारी दुपारी हरीष यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार झाल्यानंतर सायंकाळी नितीनची प्रकृती अस्वस्थ वाटू लागली. मात्र झोप न झाल्यामुळे तसे वाटत असेल म्हणून औषध घेऊन ते घरीच होते. शनिवारी सकाळी ८.३० वाजेच्या सुमारास ते बाथरूमला जाऊन आले व त्यांना श्वास घ्यायला त्रास होऊ लागला. त्यांची ती अवस्था पाहून घरच्यांनी लगेच १०८ या क्रमांकावर फोन करून रुग्णवाहिका व वैद्यकीय मदतीची मागणी केली. अर्ध्या तासात रुग्णवाहिका आली. मात्र त्यात ना ऑक्सिजन ना सोबत स्ट्रेचर. अड्याळकर कुटुंब वरच्या मजल्यावर राहते. रुग्णवाहिकेत एक महिला डॉक्टर आणि चालक असे दोघेच होते. डॉक्टरांनी नितीन अड्याळकर यांची नाडी तपासली व ते मृत झाले असल्याचे सांगितले, मात्र रुग्णवाहिकेने यांना मेडिकलला घेऊन जा तेथे उपचार होतील तर हे वाचू शकतील, असे कुटुंबाचे म्हणणे होते. डॉक्टर मात्र मनपाच्या झोनची हद्द कुटुंबाला समजवत राहिल्या आणि शेवटी रुग्णवाहिका डॉक्टरसह निघून गेली. त्यानंतर पुन्हा दुसरी रुग्णवाहिका मिळविण्यासाठी कुटुंबीयांची धडपड सुरू झाली. मात्र आयुष्यभर समाजासाठी धावणाऱ्या हरीष अड्याळकर यांच्या मुलासाठी एकही रुग्णवाहिका मिळत नव्हती.

मेडिकलचे अधीक्षक डॉ. अविनाश गावंडे यांना याबाबत कळताच त्यांनी दुपारी १२.३० च्या सुमारास डॉक्टरांच्या पथकासह एक रुग्णवाहिका पाठवली. मात्र तोवर उशीर झाला होता. त्यानंतर नितीन यांना मेडिकलला नेण्यात आले. तेथे त्यांना अधिकृतपणे मृत घोषित करण्यात आले. पहिली रुग्णवाहिका आली त्यावेळी नितीन जिवंत होते मात्र दुसरी रुग्णवाहिका येईपर्यंत म्हणजे तीन ते चार तासांच्या काळात त्यांची प्राणज्योत मालवली. त्या महिला डॉक्टरने संवेदनशीलता दाखविली असती तर नितीन यांचे प्राण वाचू शकले असते असे घरच्यांना वाटत आहे.

५३ वर्षीय नितीन एका खासगी प्रतिष्ठानात काम करीत होते. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगी, १ मुलगा व मोठा आप्त परिवार आहे. शुक्रवारी ज्या मोक्षधाममध्ये पित्यावर अंत्यसंस्कार झाले, त्याच ठिकाणी २४ तासात मुलावर अंत्यसंस्काराची वेळ या कुटुंबावर आली.

# कोरोनाशी लढताना अशी वाढवा इम्युनिटी

**नागपूर :** सध्या कोरोना विषाणूचा सर्वत्र कहर सुरू आहे. या विषाणूच्या प्रादुर्भावापासून बचाव करण्यासाठी रोगप्रतिकारक शक्ती म्हणजेच इम्युनिटी बळकट करणे आवश्यक आहे. इम्युनिटी कमजोर असणाऱ्यांना कोरोनाचा धोका अधिक आहे. इम्युनिटी आपल्या शरीरातील टॉक्सिन्सशी लढण्यास मदत करते. चांगली इम्युनिटी, केवळ सर्दी, खोकल्यापासूनच वाचवत नाही, तर काविळ, यकृताचा संसर्ग, किडनीचा संसर्ग अशा अनेक आजारांपासून बचाव करण्यास मदत करते. रोगप्रतिकारशक्ती कमकुवत असण्याची अनेक कारणे आहेत. आधीपासूनच असलेला एखादा आजार, व्यसनाची सवय, झोप पूर्ण न घेणे, खाण्या-पिण्याच्यसवयी रोगप्रतिकार शक्ती कमजोर करण्यास कारणीभूत ठरतात. यामुळे रोगप्रतिकार शक्ती वाढवण्याची गरज आहे.

रोगप्रतिकार शक्ती कमी आहे कसे ओळखाल?

आतड्यांमधील बॅक्टेरिया थेट इम्युन सिस्टमवर विपरित परिणाम करतात. सतत अतिसार, अल्सर, गॅसेसचा त्रास, सूज येणे, अतिसार किंवा बद्धकोष्ठता असेल तर रोगप्रतिकार शक्ती योग्यरित्या काम करीत नाही असे समजावे. यावर डॉक्टरांचा सल्ला त्वरीत घ्यावा.

झोप पूर्ण होऊनही थकवा जाणवत असल्यास हे इम्युनिटी कमजोर असल्याचं लक्षण असू शकतं.

शरीरावर जखम झाली असेल ती जखम लवकर बरी होत नसेल तर रोगप्रतिकारशक्ती कमी आहे, असे म्हणता येईल. डॉक्टरांशी संपर्क साधून यावर सहज उपाय करता येतात.

अशी वाढवा इम्युनिटी-

कोरोना काळात आठ तासांची झोप घ्यावी. तणावापासून दूर राहावे. रक्तक्षय होणार नाही, याची खबरदारी घ्यावी. व्हिटॅमिन डी इम्युनिटी वाढवण्याचे काम करते. व्हिटॅमिन डीची कमतरता असल्यास ती भरुन काढण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. कोरोनाच्या काळात सर्वांनी व्हिटॅमिन सी, झिंक, घ्यावे. प्रोटीनयुक्त पदार्थांचे सेवन करावे.

# दोन वर्षांपूर्वीचा पूल पुरामुळे उद्ध्वस्त

**नागपूर :** फडणवीस सरकारच्या कार्यकाळात दोन वर्षांपूर्वी वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेला पारशिवनी तालुक्यातील मोठा पूल वाहून गेल्याने खळबळ उडाली आहे. या पुलासह विभागातील अन्य पूल व रस्त्यांच्या दुर्दशेची चौकशी करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापन केली.

ऑगस्टच्या अखेरीस २९ व ३० तारखेला झालेला सततधार पाऊस आणि त्यातच धरणातील पाणी सोडल्याचा फटका पूर्व विदर्भाला बसला. हजारो एकरमधील पीक नष्ट झाले, घरे वाहून गेली तसेच, सुमारे २२ कोटी रुपयांचे रस्ते व पूल उद्ध्वस्त झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. पारशिवनी तालुक्यातील माहुली-सालई-बिटोलीदरम्यान असणारा मोठा पूल अतिवृष्टीने वाहून गेला. २६० मीटर लांबीचा पूल पाण्यामुळे ध्वस्त होत असल्याचे ३० ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता लक्षात आले. अवघ्या काही वेळात पुलाचे ८ गाळे पाण्याने वाहून गेले. २०१५ साली बांधकाम सुरू केल्यानंतर २०१८ पासून वाहतूक सुरू झाली. पुलाला १० मीटरचे २६ गाळे असून साडेअकरा मीटर रूंदी आहे. पुलाच्या दोन्ही बाजूला असलेले ४०० मीटर लांबीचे जोड रस्तेही उद्ध्वस्त झाले.

या पुलासह विभागाच्या अन्य जिल्ह्यातील पूल आणि रस्तेही वाहून गेले. याची चौकशी करण्यासाठी बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता व सहसचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. संकल्प चित्र विभागाचे तसेच, नागपूरच्या दक्षता व गुण नियंत्रण मंडळाचे अधीक्षक अभियंता सदस्य तर, नवी मुंबईतील संकल्प चित्र (पूल) मंडळाचे अधीक्षक अभियंता सदस्य सचिव आहेत. नागपूर, चंद्रपूर आणि गडचिरोलीत क्षतिग्रस्त पुलांची माहिती समिती घेणार आहे. पुलाच्या क्षतिग्रस्त होण्यामागील कारणे, भविष्यात अशा प्रकारची हानी टाळण्यासाठी उपाययोजना आणि संकलनाच्या पद्धतीत आवश्यक सुधारणा सुचवण्यासाठी समितीला दोन महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे.

पुलावरील वाहतूक आधीच बंद केल्याने मोठा धोका टळल्याचा दावा विभागाने केला आहे. विभागानेदेखील चौकशी सुरू केली असून एक महिन्यात पूर्ण करण्यात येणार असल्याचे समजते.

माथनीचा पूलही खचला

रामटेक-मौदारोडवरील माथनी येथील कन्हान नदीवरील पूल क्षतिग्रस्त झाला. ब्रिटिशकालीन पुलावरील कॉंक्रिट स्लॅब वाहून गेले. कामठी तालुक्यातील कुही-पाडेगाव-राजोरा, सोनेगाव-गादा रस्ता व नाल्या वाहून गेल्या. रस्ता कापल्या गेला आणि त्याखालील दीड मीटर खोल जमीन वाहून गेली. पारशिवनी तालुक्यातील पाली-उमरी पुलाचे जोड रस्ते वाहून गेल्याने गावाचा संपर्क तुटला होता.

रस्ते, पुलांवर खड्डे

भंडारा जिल्ह्यात ३२ किलोमीटर रस्ते, १५ पुलांना फटका बसला. गोंदिया जिल्ह्यात ६ राज्य महामार्ग, ८ प्रमुख जिल्हा मार्ग उद्ध्वस्त झाले. ठिकठिकाणी खड्डे पडले. ८ पूल क्षतिग्रस्त झाले. खैरलांजी येथील वैनगंगा नदीवरील पूल क्षतिग्रस्त झाला. बेअरिंग खराब झाल्याने त्याची तपासणी करण्यात येणार आहे. चंद्रपूर जिल्ह्यात ८० किलोमीटर लांबीचे प्रमुख रस्ते व ३२ पूल पाण्याखाली असल्याने खराब झाले व पोचमार्ग वाहून गेले. गडचिरोली जिल्ह्यातील वडसा, आरमोरी, कोरची आणि गडचिरोली या चार तालुक्यांना पावसाचा फटका बसला. १८ रस्ते खराब झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

# मोबाईल हॅक करून १२.७५ लाख काढले

**नागपूर.** सुंदर कंपनीच्या मालकाचा मोबाईल हॅक करून १२.७५ लाखांनी फसवणूक केल्याचे प्रकरण समोर आले आहे. या प्रकरणी कोराडी पोलिसांनी एस.के.गुप्ता मार्ग, न्यू कॉलनी छावनी निवासी विक्रम सुंदरलाल सेतिया (४०) च्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विक्रम सेतिया हे स्मृतीनगर, पांझरा येथील सुंदर इंडस्ट्रीजचे संचालक आहेत. १८ ते २० ऑगस्ट दरम्यान अज्ञात सायबर गुन्हेगाराने मोबाईल हॅक करून त्यांच्या बँक खात्यातून आरटीजीएसच्या माध्यमातून १२,७५,००० रुपये काढले. बँकेतून पैसे निघाल्याचा मॅसेज पाहून विक्रम यांना मोठा धक्काच बसला. त्यांनी घटनेची बँकेसह पोलिसांकडे तक्रार केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर फसवणूक व आयटी ॲक्ट अन्वये गुन्हे नोंदवून तपास सुरू केला आहे.

**G. G. DANDEKAR MACHINE WORKS LIMITED**

**Regd. Office:** 211/A, MIDC Butibori Industrial Area, Village Kinhi, Tal. Hingana, Dist. Nagpur - 441122

**CIN:** L99999MH1938PLC002869, **E-mail:** cs@ggdandekar.com, **Website:** www.ggdandekar.com, **Ph.:** +91(07103)295109

**NOTICE OF 81st ANNUAL GENERAL MEETING, E-VOTING AND BOOK CLOSURE DATES**

Notice is hereby given that 81st Annual General Meeting (AGM) of **G. G. Dandekar Machine Works Limited** ('the Company') will be held on **Monday, the 28th day of September 2020 at 11.30 a.m. (IST)** through Video Conferencing ('VC') or Other Audio-Visual Means ('OAVM') facility, in compliance of provisions of the Companies Act, 2013 ('the Act') and Rules thereof read with the General Circular No. 14/2020 dated 8th April 2020; the General Circular No. 17/2020 dated 13th April 2020 and the General Circular No. 20/2020 dated 5th May 2020 issued by the Ministry of Corporate Affairs (hereinafter referred as "Circulars") and the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, read with the SEBI Circular No. SEBI/HO/CFD/ CMD1/CIR/P/2020/79 dated 12th May 2020, to transact the business as set out in the Notice of AGM.

NOTICE is further given that, pursuant to the provisions of Section 91 of the Companies Act, 2013, Rules thereof and Regulation 42 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, including the amendments thereunder, the Register of Members and Share Transfer Books of the Company will remain closed from Tuesday, 22nd September 2020 to Monday, 28th September 2020 (both days inclusive) for the purpose of AGM.

In compliance with the aforesaid MCA Circulars and SEBI Circular, the Notice of AGM along with the Statement annexed to the Notice pursuant to section 102 of the Companies Act, 2013 and Rules thereof including amendments thereunder and the Annual Report of the Company for the financial year2019-20 have been sent to the Members only electronic mode to those Members whose email addresses are registered with the Company / the Depository Participants (DPs) / the Register and Share Transfer Agent (R & T Agent), as the case may be. The aforesaid documents are also available on the website of the Company viz. www.ggdandekar.com, on the websites of Stock Exchange i.e. BSE Limited at www.bseindia.com.

Pursuant to the provisions of Section 108 of the Companies Act, 2013 and Rule 20 of the Companies (Management and Administration) Rules, 2014 and as amended from time to time, Regulation 44 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 and Secretarial Standard on General Meetings (SS-2) issued by the Institute of Company Secretaries of India including amendments thereunder, the Company is providing the facility to its members holding shares as on 21stSeptember 2020, being cut-off date, to exercise their right to vote on all resolutions set forth in the Notice of AGM. The members may cast their votes using an electronic voting system from a place other than the venue of the meeting ('remote e-voting') or by e-voting at the AGM. The Company has engaged National Securities Depository Limited (NSDL) to provide remote e-voting facility. The details of remote e-voting are as under:-

1. Date of completion of sending Notice of AGM along with Annual Report: 06th September, 2020.
2. The remote e-voting period commences on **Friday, 25th September 2020 (9.00 a.m. IST)** and ends on **Sunday, 27th September 2020 (5.00 p.m. IST)**.
3. The voting through remote e-voting shall not be allowed beyond 5.00 p.m. on 27th September 2020.
4. Any person, who acquires shares of the Company and become Member of the Company after dispatch of the Notice and holding shares as of the cut-off date i.e. Monday, 21st September 2020, may obtain User-Id and Password by sending a request at evoting@nsdl.co.in or pune@linkintime.co.in or cs@ggdandekar.com. If a person is already registered with NSDL for Remote e-voting, then existing User-Id and Password can be used for casting vote. If you forgot your password, you can reset your password by using 'Forgot User details/Password' option available on www.evoting.nsdl.com. A member can also use the OTP (One Time Password) based login for casting the votes on the e-voting system of NSDL.
5. The members attending the AGM through VC/OAVM facility, who have not casted their vote by Remote e-voting shall be able to exercise their right at the AGM through e-voting.
6. A member may participate in the AGM even after exercising his right to vote through Remote e-voting but shall not be allowed to vote again at the AGM.
7. A person whose name is recorded in the Register of Members or Register of the Beneficial Owners maintained by the Depositories as on the Cut-off date i.e. Monday, 21st September 2020 shall be entitled to avail the facility of either remote e-voting or e-voting at the AGM.
8. The procedure of electronic voting and attending the AGM through VC/OAVM is available in the Notice of AGM.
9. The manner of registration of e-mail addresses of those Members whose email addresses are not registered with the Company/the R&T Agent/DP is available in the Notice of AGM.
10. In case of any queries, you may refer Frequently Asked Questions (FAQs) for Members who need assistance before or during the AGM and e-voting user manual for Members available on the website www.evoting.nsdl.comunder the 'Downloads Section' or Members may contact NSDL on toll free number 1800-222-990 or Ms. Sarita Mote, Assistant Manager, NSDL, Trade World, A Wing, 4th Floor, Kamala Mills Compound, Senapati Bapat Marg, Lower Parel, Mumbai 400 013 at designated email IDs: evoting@nsdl.co.in or saritam@nsdl.co.in or at telephone no. (022) 24994545, who will address the grievances related to electronic voting. The Members can also write to the Company Secretary at ir@ggdandekar.com.

By the Order of the Board of Directors
For **G. G. Dandekar Machine Works Limited**
Sd/-
Sayalee Yengul
**Company Secretary**

Place : Nagpur
Date : 06th September, 2020

# पॉलिटेक्निककडे का वाढतोय विद्यार्थ्यांचा ओढा?

**नागपूर :** राज्यात पॉलिटेक्निक अभ्यासक्रमाच्या १ लाख १७ हजार जागांसाठी ८७ हजारांवर विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. गेल्या काही वर्षात विद्यार्थ्यांनी तंत्रनिकेतनकडे पाठ फिरवल्यानंतर यंदा मात्र मोठ्या प्रमाणावर नोंदणी करण्यात आली आहे. त्यामुळे आता पॉलिटेक्निककडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढत असल्याचे चित्र दिसून येत आहे. पूर्व विदर्भात आलेल्या पुरामुळे नोंदणीला गुरूवारपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

व्यावसायिक अभ्यासक्रमातील प्रवेशाचे चित्र गेल्या पाच वर्षात आशादायी नाही. अभियांत्रिकी, पॉलिटेक्निक आणि इतर अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांनी पाठ फिरवली. यामुळे या अभ्यासक्रमात रिक्त जागांची संख्या गेल्या पाच वर्षात बरीच मोठी आहेत. या प्रकाराने पाच वर्षात किमान पन्नासाहून अधिक महाविद्यालये बंद पडली, तर अनेक महाविद्यालयांनी या अभ्यासक्रमातील शाखा बंद करण्याचे प्रस्ताव विद्यापीठ आणि अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे दिलेत.

मात्र, यावर्षी दहावीचा निकालात २६ टक्क्यांनी वाढ झाली. त्यामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमाकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढणार असल्याचे भाकित सकाळने वर्तविले होते. त्यानुसार आतापर्यंत ८७ हजारांवर विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. यावर्षी राज्यात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव लक्षात घेता विभागाने तंत्रनिकेतन अभ्याक्रमाचे प्रवेश ऑनलाईन पद्धतीने करण्याचा निर्णय घेतला. यामुळे यावर्षी विद्यार्थ्यांना घरून अर्ज भरता येणे शक्य होणार आहे. १० सप्टेंबरपर्यंत नोंदणीला दुसऱ्यांदा मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे हा आकडा १ लाखापेक्षा अधिक होण्याची शक्यता नाकारता येत नाही.